GR200407271232050001

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परिक्षा / आदिवासी / विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आयोजित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः- एसपीई २००२/(२६४/०२) साशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २४ फेब्रुवारी, २००३.

वाचा :- १) शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक, एसएसजी १३५३/ दिनांक २ एप्रिल १९५४.

<u>प्रस्तावना :-</u> संदर्भाधीन शासन निर्णय, क्रमांक,एसएसजी १३५३/ दिनांक २ एप्रिल १९५४,मधील आदेशानुसार इयत्ता ४थी अखेर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात घेण्यात येत होती. तथापि वर्ष २००२-२००३ पासून इयत्ता ४थी अखेर विद्यार्थ्यांची प्राथमिक शालेय प्रमाणपत्र परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर एकाच वर्षात विद्यार्थ्यांवर दोन परीक्षांचा बोजा पडू नये या दृष्टिने प्राथमिक शालेय प्रमाणपत्र परीक्षेमध्येच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी / विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा समाविष्ट करून एकत्रितपणे घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्राथमिक शालेय प्रमाणपत्र परीक्षा स्थगित करण्यात आली असल्याने या परीक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या १) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, २) शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, ३) आदिवासी / विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा या परीक्षा पूर्वीप्रमाणेच आयोजित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u> उपरोक्त बाबींचा विचार करून शासन आता असे आदेश देत आहे की, १) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, व शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परिक्षा, आणि २) आदिवासी / विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आता एकत्रितपणे घेण्यात येतील.

१) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा व शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि आदिवासी / विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा रविवार दिनांक २७ एप्रिल २००३ रोजी आयोजित करण्यात येईल.

२) या परीक्षेसाठी प्रतिविद्यार्थी आवेदनपत्र शुल्क रू. ५/- व परीक्षा शुल्क रू. २०/- इतके असेल. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि भटक्या व विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

३) सदर परीक्षा दिनांक २७.०४.२००३ या एकाच दिवशी घेण्यात येईल. परीक्षेसाठी खालीलप्रमाणे विषय व गुण असतील.

| अनुक्रमांक | प्रश्नपत्रिका | प्रश्नसंख्या | एकूण गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | भाषा व समाजशास्त्र (७०% व ३०%) | ५० | १०० | ११ ते १२ |
| २ | गणित | ५० | १०० | १ ते २ |
| ३ | बुध्दिमत्ता चाचणी व सामान्य विज्ञान (५०% व ५०%) | ५० | १०० | ३ ते ४ |

४) सदर परीक्षा पूर्णत: वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल.

५) या परीक्षेच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची राहील.

६) या परीक्षेसाठी यथापूर्व मान्य केलेल्या जिल्हानिहाय शिष्यवृत्ती संच संख्येप्रमाणे निवड याद्या तयार करुन त्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिष्यवृत्ती विभाग, यांना उपलब्ध करुन द्याव्यात आणि या निवड याद्यांप्रमाणे शिक्षण संचालकांनी शिष्यवृत्त्या प्रदान करण्याची यथापूर्व कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे या परीक्षेच्या आधारे शासकीय विद्यानिकेतन आणि आदिवासी / विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या मुलांसाठी असलेल्या विद्यानिकेतन प्रवेशासाठी विद्यानिकेतन निहाय निवड याद्या यथापूर्व निकषानुसार परीक्षा परिषदेने तयार करुन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)/संचालक, समाजकल्याण आणि आदिवासी विकास विभाग यांना विद्यानिकेतन प्रवेशासाठी उपलब्ध कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ज. मो. फाटक )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक )/(प्राथमिक)महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण ),महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी,(प्राथमिक/ माध्यमिक),जिल्हा परिषद.
सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई,मुंबई.